महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण ०२/२०११/प्र.क्र.१३/ई-१
दिनांक : २९ मार्च, २०१२.

वाचा:- १. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.एस-१४/३६१३/प्र.क्र.२०९(२)/ई-३, दि.३०.४.१९९२, दि.२६.६.१९९२, दि.२६.७.१९९३ व दि.१३.१०.१९९३.
२. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.संकीर्ण ०२/२०११/प्र.क्र.१३/ई-१, दि.२९.७.२०११.

परिपत्रक :-

शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एस-१४/३६१३/प्र.क्र.२०९/ई-३, दि.२८.९.१९९२ अन्वये राज्यातील प्रत्येक जिल्हयासाठी एक या प्रमाणे अपर जिल्हाधिकारी यांची पदे निर्माण करण्यात आली आहेत. प्रत्येक जिल्हयासाठी अपर जिल्हाधिकाऱ्याचे स्वतंत्र पद निर्माण करण्यात आल्याने जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांच्यामध्ये विषयवारीनुसार कामाची वाटणी करण्याबाबत वर नमुद केल्याप्रमाणे वेळोवेळी प्रशासकीय आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

२. उपरोक्त दिनांक २९.७.२०११ च्या परिपत्रकान्वये अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विषयक बाबी हा विषय अपर जिल्हाधिकारी यांच्या ऐवजी जिल्हाधिकारी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे असलेल्या कामाचा विचार करुन प्रशासकीय दृष्टीकोनातून जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांच्याकडील विषयांचे वाटप करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. या अनुषंगाने सर्व विभागीय आयुक्तांकडून प्राप्त झालेल्या शिफारशी व विषयांचे स्वरुप विचारात घेवून जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांच्यामधील कामाची वाटणी पुढील प्रमाणे करण्यात येत आहे :-

<u>जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपूर्द करावयाचे विषय :</u>

१) राजस्व अभियान
२) कायदा व सुव्यवस्था
३) शासकीय वसुली
४) अन्न व नागरी पुरवठा विषयक बाबी.
५) महानगरपालिका हद्दीतील आणि "अ" वर्ग नगरपालिका हद्दीतील जमिनीचे व्यवस्थापन
६) "अ" वर्ग नगरपालिका क्षेत्रातील अकृषिक परवानगी
७) सर्व प्रकारचे भूमी संपादन अधिग्रहण



Scanned with CamScanner

८) नागरी कमाल जमीन मर्यादा व त्या अनुषंगिक बाबी
९) नैसर्गिक आपत्ती आणि मदतकार्य
१०) सार्वत्रिक निवडणूक विषयक बाबी .
११) दशवार्षिक जनगणना
१२) जिल्हा परिषद निवडणूका
१३) पदवीधर/शिक्षक मतदार संघाच्या याद्या तयार करणे
१४) अवर्षण व तदनुषंगिक सर्व बाबी
१५) जिल्हा पातळीवरील सर्वसामान्य समन्वयन
१६) रोजगार हमी योजना, ग्रामीण भूमिहीनांसाठी रोजगार हमी कार्यक्रम (जवाहर योजना) आणि इतर रोजगार कार्यक्रम.
१७) जिल्हा नियोजन आणि दोन कोटींचा कार्यक्रम.
१८) तक्रार निवारण, राजशिष्टाचार, अति महत्वाच्या व्यक्तींचे दौरे, राष्ट्रीय कार्यक्रम इत्यादी
१९) उपजिल्हाधिकारी, तहसिलदार आणि नायब तहसिलदार यांच्या आस्थापनाविषयक बाबी
२०) अवल कारकून, मंडळ निरीक्षक, कनिष्ठ लिपिक, तलाठी व शिपाई यांच्या आस्थापनाविषयक बाबी
२१) शासकीय निवासस्थानाचे वाटप
२२) आर्म्स ॲक्टसाठी परवाने देणे
२३) गणेशोत्सव, दुर्गा, दसरा इ. उत्सवांसाठी मनोरंजनाची परवानगी देणे
२४) व्हिडीओ गृहाचा परवाना देणे
२५) कोर्ट ऑफ वॉर्डसची कामे
२६) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व समाजातील इतर दुर्बल घटकावरील अत्याचारांना प्रतिबंध करणे आणि बाधित व्यक्तींच्या पुनर्वसनाविषयी योग्य ती कार्यवाही सुरु करणे
२७) सैनिक कल्याण
२८) नगरपालिका प्रशासन
२९) अल्प बचत
३०) खरेदीसारख्या वित्तीय बाबी जिथे विभाग प्रमुख म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी अधिकाराचा वापर करावयाचा आहे.
३१) औद्योगिक विकास, जिल्हा औद्योगिक केंद्र विषयक बाबींसह
३२) २० कलमी कार्यक्रमांचे कार्यान्वयन (मुख्यत्वेकरुन अपर जिल्हाधिकाऱ्यांकडे देण्यात आलेल्या बाबी वगळता)
३३) दारुबंदी आणि उत्पादन शुल्क विषयक बाबी
३४) पतपुरवठा नियोजन आणि त्यासंबंधी इतर बाबी
३५) आरोग्यविषयक कार्यक्रम
३६) शेती उत्पादन कार्यक्रम
३७) वर नमूद करण्यात आलेल्या विषयाबाबत सर्व समित्यांच्या बैठका घेणे.
३८) वेठबिगाराचे पुनर्वसन

३१) अपर जिल्हाधिकाऱ्यांकडे विनिर्दिष्टपणे देण्यात न आलेले इतर कोणतेही विषय

**अपर जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपुर्द करावयाचे विषय :**

१) सर्व प्रकारची शासकीय वसुली
२) करमणूक कर व तद्नुषंगिक बाबी
३) गौण खनिजे व त्याविषयक बाबी
४) ब आणि क वर्ग नगरपरिषदेतील व ग्रामीण भागातील जमिनीचे व्यवस्थापन
५) रचना व कार्यपध्दती, कर्मचारी वर्गाचे प्रशिक्षण आणि दुय्यम कार्यालयांची तपासणी
६) भूमी अभिलेख सर्वेक्षण आणि जमाबंदी (तलाठी आणि मंडळ निरीक्षक यांचेमार्फत महसूली गाव दप्तराची परिरक्षा इत्यादीसह)
७) जमाबंदी (बिनशेती आकारणीसह)
८) कमाल जमीन धारणा, कुळ वहिवाट, आदिवासींना जमीन परत करणे इ. जमीन सुधार विधीविधान विषयक कार्यान्वयन)
९) मुंबई ग्रामपंचायत अधिनियमाखालील निवडणूकासह ग्रामपंचायत विषयक सर्व बाबी
१०) निखात निधी अधिनियम व तद्नुषंगिक बाबी
११) मुद्रांक अधिनियम व तद्नुषंगिक बाबी
१२) नोंदणी अधिनियम व त्याविषयीच्या इतर बाबी
१३) पीक अंदाज सर्वेक्षण, पिकांचे पूर्वानुमान, पैसेवारी व कृषी गणना इ.
१४) अंदाजपत्रक (कार्यक्रम अंदाजपत्रकासह) आणि अंतर्गत लेखा परीक्षा
१५) दुय्यम कार्यालयांची तपासणी (हे काम जिल्हाधिकाऱ्यासह)
१६) कर्जमुक्ती कायदा
१७) निर्वासितांची संपत्ती अधिनियम
१८) जिल्हा सैनिक मंडळ
१९) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता व इतर अधिनियम या खालील अपीले
२०) अत्यंत तातडीने विहिरी बांधण्याविषयीच्या विशेष योजनेचे कार्यान्वयन व संजय गांधी निराधार अनुदान योजना इ.
२१) किमान वेतन कायद्याचे कार्यान्वयन
२२) वेठबिगार व्यवस्था निर्मूलन कायद्याचे कार्यान्वयन
२३) गावठाण विस्तार योजना आणि ग्रामीण भागातील बेघर भूमिहीनांना घरासाठी जागा व त्यावर घरकूल बांधून देण्याची योजना यासाठी भूमी संपादन व अधिग्रहण.
२४) तगाई, बांधबंदिस्ती आणि इतर शासकीय वसुली
२५) शासकीय मुद्रणालयाकडून निरनिराळे नमुने, लेखनसामग्री, छापील साहित्य इ.चा पुरवठा
२६) वर नमूद करण्यात आलेल्या विषयाबाबतच्या सर्व बैठका
२७) आयुक्त/शासन यांनी सुपूर्द केलेले इतर कोणतेही विषय
२८) गावठाण विस्तार योजना व बेघर भूमिहीनांना जागा व घरकूल बांधून देणे
२९) स्वातंत्र्यसैनिकांची विविध प्रकरणे
३०) वक्फ बोर्ड अधिनियमाखालील प्रकरणे



Scanned with CamScanner

३१) संजय गांधी योजना /
३२) विशेष कृती कार्यक्रम /
३३) कुटुंब नियोजन कार्यक्रम ,
३४) भाडे नियंत्रण कायद्यासंबंधी पत्रव्यवहार/
३५) वर्धा योजना /
३६) प्रकल्पबाधित व्यक्तींचे आणि पुरग्रस्तांचे पुनर्वसन, /
३७) विनिर्दिष्ट सहकारी संस्थाविषयक बाबी /
३८) जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्याविषयीच्या बाबी ,
३९) कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूका /

३. तरी सर्व विभागीय आयुक्तांनी त्यांच्या अधिनस्थ जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये संबंधित जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांच्या संदर्भात वरील विषय वाटपानुसार कामाची विभागणी करण्याबाबत योग्य ती पुढील कार्यवाही त्वरित करावी. तसेच यासंदर्भातील यापूर्वीचे सर्व आदेश अधिक्रमित झाले आहेत असे समजण्यात यावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१२०३२९०६५०१०३१०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(स्वा.शि.क्षत्रिय)
अपर मुख्य सचिव (महसूल), महाराष्ट्र शासन.

प्रति,
१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
८. महालेखापाल १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
९. सर्व मंत्रालयीन विभाग,
१०. सर्व विभागीय आयुक्त,
११. सर्व जिल्हाधिकारी,
१२. सर्व अपर जिल्हाधिकारी,
१३. महसूल व वन विभागातील सर्व कार्यासने.
१४. निवडनस्ती (ई-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.



Scanned with CamScanner

**जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांच्यामधील कामाचे वाटप .**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः एसएनटी-२०१५/प्र.क्र.२८/ई-१ अ**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**
मंत्रालय ,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २५ मे, २०१५

वाचा :-

१. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्रमांकः संकीर्ण ०२/२०११/प्र.क्र.१३/ई-१, दिनांक २९.०३.२०१२

२. मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे आदेश क्रमांक-रानिआ/ मनपा-२०१५ / प्र.क्र.६/ का-५, दिनांक १०.०२.२०१५

परिपत्रक-

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यासाठी अपर जिल्हाधिकाऱ्यांचे प्रत्येकी एक पद दिनांक २८.०१.१९९२ च्या शासन निर्णयान्वये निर्माण करण्यात आल्यानंतर जिल्हाधिकारी यांच्याकडील कामाची विभागणी जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांच्यामध्ये शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्रमांकः एस-१४/३६१३/प्र.क्र.२०९(२)/ई-३, दिनांक ३०.०४.१९९२ अन्वये प्रथम करण्यात आली. त्यांनतर गरजेनुसार विषयवाटपामध्ये वेळोवेळी बदल करण्यात आले असून, सध्या संदर्भाधीन दिनांक २९ मार्च २०१२ रोजीच्या परिपत्रकामध्ये केलेले वाटप अंमलात आहे.

२. दिनांक २९ मार्च २०१२ रोजीच्या सदर परिपत्रकामध्ये जिल्हाधिकाऱ्यांकडे क्रमांक १२ नुसार " जिल्हा परिषद निवडणूका " संबंधी कामकाज सोपविण्यात आले आहे. तर अपर जिल्हाधिकारी यांचेकडे क्रमांक ९ नुसार " मुंबई ग्रामपंचायत अधिनियमाखालील निवडणूकांसह ग्रामपंचायत विषयक सर्व बाबी " चे काम सुपूर्द करण्यात आलेले आहे.

३. या अनुषंगाने शासनाने मा. राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भीय प्रस्तावाचा सर्वंकष विचार करून आणखी असा निर्णय घेतला आहे की, शासन परिपत्रक दिनांक २९.०३.२०१२ मध्ये नमूद केलेल्या जिल्हा परिषद निवडणूकांबरोबरच नगर परिषद/नगर पंचायत व पंचायत समितीच्या निवडणूकीची सर्व जबाबदारीही जिल्हाधिकारी यांच्याकडे सुपूर्द करण्यात यावी व जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यबाहुल्याचा विचार करता ग्रामपंचायत निवडणूकांची जबाबदारी पूर्वीप्रमाणेच अपर जिल्हाधिकारी यांच्याकडेच ठेवण्यात यावी.

३. वरील निर्णयाच्या अनुषंगाने विषय वाटपाबाबत दिनांक २९ मार्च २०१२ रोजीच्या संदर्भाधीन परिपत्रकामध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत :-

जिल्हाधिकारी यांच्याकडे सुपूर्द करावयाच्या विषयातील अ.क्र. १२ येथे "जिल्हापरिषद निवडणूका" ऐवजी "जिल्हापरिषद निवडणूका व पंचायत समित्यांच्या निवडणूका तसेच नगर परिषद / नगर पंचायत यांच्या निवडणूका " असे वाचण्यात यावे.

Scanned with CamScanner

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेताक क्र.२०१५०५२५१४५२०१५८१९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Madhav Narayan Kale

Digitally signed by Madhav Narayan Kale
DN: CN = Madhav Narayan Kale, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = REVENUE AND FOREST
Date: 2015.05.26 12:08:56 +05'30'

( माधव काळे )
शासनाचे उप सचिव

प्रति,

१. सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२
२. सर्व विभागीय आयुक्त.
३. सर्व जिल्हाधिकारी.
४. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२
५. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२
६. सर्व संबंधित अपर जिल्हाधिकारी (विभागीय आयुक्तांमार्फत)
७. प्रधान सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२
८. प्रधान सचिव (नगरविकास) यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२
९. प्रधान सचिव (ग्राम विकास विभाग ) यांचे स्वीय सहायक, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२
१०. निवडनस्ती (ई-१ अ कार्यासन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२

Scanned with CamScanner